# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १९ / २०२१

कृषीपंप नवीन वीज जोडणी बाबत

श्री. शांताराम बाबू भेकरे ........................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) ............................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- आनंद शिवराम ओक, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- दिपक लाड

ई-सुनावणी तारीख :- २९ एप्रिल २०२१

आदेश पारित दिनांक :- १० मे २०२१

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, रत्नागिरी परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ३१ डिसेंबर २०२० च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १९ मार्च २०२१ रोजी दाखल केलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२.	मंचाने तक्रारदार यांचा अर्ज क्रमांक ०९/२०२० बाबत दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केला.

> *“1. MSEDCL is directed to release Agriculture connection of the complainant within reasonable time but not later than ninety days of this order.*
>
> *2. In view of MERC order in Case no.6/2019 Dt.22/02/2019 MSEDCL is directed to pay a compensation of twice the amount of service connection charges paid by the complainant.”*

३.	अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

३.१) अपिलार्थीने कृषीपंपाकरीता नवीन वीज जोडणीचा विहित नमुन्यातील अर्ज योग्य कागदपत्रासह दिनांक ४ जानेवारी २०१८ रोजी प्रतिवादी महावितरण (चिपळूण उपविभाग) यांच्या कार्यालयात सादर केला.

३.२) दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी महावितरण (चिपळूण उपविभाग) यांच्याकडे पत्राद्वारे नुकसान भरपाईची मागणी केली.

३.३) २७ जानेवारी २०२० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाने ९ महिन्याच्या विलंबाने २९ ऑक्टोबर २०२० रोजी आदेश पारीत केला.

३.४) १० सप्टेंबर २०२० रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली व मंचाने ३१ डिसेंबर २०२० रोजी आदेश पारीत केला. त्याप्रमाणे आदेशाच्या नव्वद दिवसांच्या आत वीज जोडणी देण्याचे तसेच आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थीने भरलल्या सेवा कनेक्शन शुल्काच्या दुप्पट भरपाई देण्याचे निर्देश प्रतिवादीस दिले.

३.५) मंचाच्या आदेशात कृती मानके, विनियम २०१४ च्या विनियम ४.३ व ४.५ अन्वये मिळणाऱ्या नुकसान भरपाईचा काहीही उल्लेख नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीने अंदाजपत्रकाप्रमाणे एकुण रु.२९५९/- चा भरणा केला. यात प्रथम सुरक्षा रक्कम (First Security Deposit) रु.१०००/-, सर्व्हिस कनेक्शन चार्जेस रु.१५००/-, प्रोसेसींग फी रु.१६०/- व जीएसटी रु. २९९/- चा समावेश आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

३.६) अपिलार्थीस वास्तविक पाहता आयोगाच्या प्रकरण क्र. ६/२०१९ दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशाप्रमाणे रु.२९५९/- च्या दुप्पट रु ५९१८/- एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देणे क्रमप्राप्त आहे. मात्र प्रतिवादीने रु.१५००/- च्या दुप्पट रु.३०००/- इतकी रक्कम दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी धनादेशाने देण्यात आली.

३.७) अपिलार्थीने अभिवेदनात खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत

अ) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ (कृती मानके, विनियम २०१४) मधील विनियम ४.३ नुसार जागेची तपासणी करणेबाबतच्या विलंबाबाबतची भरपाईची मागणी रु.१३,०००/- मंजूर व्हावेत. विनियम ४.५ नुसार कोटेशन देण्यास झालेल्या विलंबाबद्दल नुकसान भरपाई म्हणून रु.१२,९००/- मंजूर व्हावेत. तसेच विनियम ४.८ नुसार वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत रु.२,९१८/- एवढया फरकाची रक्कम मंजूर केली जाऊन तसा आदेश व्हावा.

आ) न्याय मागण्यासाठी झालेला खर्च म्हणून रु.१,०००/- मंजूर करावे. इतर न्यायोचीत आदेश व्हावेत.

४. प्रतिवादी महावितरणने दिनांक ९ एप्रिल २०२१ च्या उत्तरात खालील प्रमाणे मुद्दे नमुद केले.

४.१) अपिलार्थी यांनी दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी चिपळूण उपविभागात कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणीचा अर्ज केला होता. सदर अर्जाची छाननी करून उच्चदाब वितरण प्रणाली मधून अंदाजपत्रक तयार करण्यात आले व ते पत्र क्र.EE/CPL/T/AG HVDS/2021-21/08/Dt.26.05.2020 नुसार मंजूर करण्यात आले व आवश्यक असणारे कोटेशन देण्यात आले.

४.२) त्याच दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार व महावितरणच्या दिनांक २४ जानेवारी २०१९ च्या आदेशानुसार दिनांक ३१ मार्च २०१८ नंतरच्या नवीन कृषी वीजजोडणी अर्जदारांना वीज जोडणी पारंपारिक वीज जोडणी (लघुदाब वीजवाहिनो) ऐवजी सौर उर्जा कृषीपंप देण्याचे धोरण निश्चित झाले. त्यानुसार अपिलार्थी यांना दिनांक ५ मार्च २०१९ च्या पत्रान्वये मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेचा लाभ घेण्याचे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

कळविण्यात आले. परंतू अपिलार्थी यांनी तसा कोणताही ऑनलाईन अर्ज केला नसल्याने त्यावर पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

४.३) त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली मंचाने दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या आदेशाने अपिलार्थी यांना सर्व्हीस कनेक्शन चार्जेस च्या दुप्पट नुकसान भरपाई देण्यात यावी असा आदेश देण्यात आला. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी रु.३०००/- (क्र.३९११३७) चा धनादेश नुकसान भरपाई म्हणून देण्यात आला.

४.४) अपिलार्थी यांच्या अभिवेदनात वीज जोडणीच्या विलंबाबाबत उल्लेख आहे, मात्र अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी महावितरणच्या मुख्यालयाच्या निर्देशानुसार सदर अर्जास मंजूरी देऊन त्याचा जेष्ठता यादीत समावेश करण्यात आला होता. तसेच मार्च २०१८ नंतरच्या सर्व कृषीपंप ग्राहकांना सौर उर्जेवर चालणाऱ्या पंपाद्वारे जोडणी देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला होता. कक्षाने अपिलार्थी यांना महावितरणच्या नियमाप्रमाणे लवकरात लवकर कृषी वीज जोडणी देण्यात यावी असा निर्णय दिला, परंतू महावितरणच्या चिपळूण उपविभागातर्फे प्रलंबित जेष्ठता यादी नुसार कार्यवाही सुरु होती.

४.५) मंचाने अपिलार्थी यांना आदेशाच्या दिनांकापासुन तीन महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश दिला. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना वीज जोडणी दिलेली असून मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे.

४.६) अपिलार्थी यांचे जोडणीबाबत प्रतिवादी महावितरणने कोणताही जाणीवपूर्वक उशीर केलेला नाही व शासन धोरणाच्या अधिन राहून योग्य ती कार्यवाही केली. सबब, अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी मागणी उत्तरात केली.

५. कोवीड-१९ मुळे सदर अभिवेदनाची ई-सुनावणी दिनांक २९ एप्रिल २०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे घेण्याचे ठरले, परंतू अपिलार्थीच्या विनंतीनुसार व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे सुनावणी घेण्याचे तांत्रिक दृष्टया अडचणीचे असेल्याचे सांगण्यात आले. सबब, ऑडिओ कॉन्फरंसद्वारे सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. अपिलार्थीने विनियम ४.३ व ४.५ अन्वये झालेल्या विलंबाबाबत व आयोगाच्या आदेशानुसार सर्व्हिस कनेक्शन चार्जेस रक्कमेचा योग्य तो अर्थ काढून (प्रतिवादी यांनी त्यापोटी दिलेली रक्कम वजा करुन) उर्वरीत रक्कम अशी एकुण रु.२८,८१८/- (रु.१३,०००/- +

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

रु.१२,९००/- + रु.२,९१८/-) नुकसान भरपाई पोटी देण्यात यावी असे प्रतिपादन केले. त्याशिवाय न्याय मागण्यासाठी झालेला खर्च म्हणून रु.१,०००/- सुध्दा मंजूर करावेत.

प्रतिवादीने नमुद केले की, मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना वीज जोडणी दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या वीज जोडणी बाबत प्रतिवादी महावितरणकडुन कोणताही जाणीवपुर्वक उशीर झालेला नाही. शासन धोरणास अनुसरूनच महावितरणतर्फे निर्णय घेण्यात आलेत. त्यामुळे अपिलार्थीची मागणी फेटाळण्यात यावी.

**विश्लेषण व निर्णय**

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांनी नमुद केलेल्या मुद्दयांचा विचार करीता प्रथमदर्शनी असे लक्षात येते की, त्यांना आयोगाच्या प्रकरण क्र. ६/२०१९ दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशाचे योग्य तो आकलन झाले नाही. सदर आदेशातील महावितरणतर्फे मांडण्यात आलेल्या सर्व मुद्दयांचा साकल्यांने विचार करता व आयोगाने त्याची कारणमिमांसा व दिलेले आदेश याचे योग्य ते आकलन केल्यास असे लक्षात येईल की, कृषीपंप जोडणी करीता एकुण आलेल्या अर्जांची संख्या, निरनिराळया संस्था व शासनाकडुन होणाऱ्या निधीची उपलब्धता, वीज संच मांडणीकरीता लागणारी साधन सामुग्री, ती उभी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी, पावसाळयात ग्राहकाच्या शेतात जाण्यासाठी येणाऱ्या अडचणी इत्यादी सर्व बाबींचा विचार केल्यावर माननीय आयोगाने नुकसान भरपाईच्या महत्तम देय रक्कमेला मर्यादा घातली आहे व हो मर्यादा ग्राहकाने भरलेल्या सर्व्हिस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट राहील असे आदेशीत केले आहे. या रक्कमेत विनियम ४.३ व ४.५ अंतर्गत येणाऱ्या रक्कमेचा सुध्दा समावेश आहे, अन्यथा सर्व्हिस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट या महत्तम मर्यादेला काहीही अर्थ राहिला नसता. सबब, ग्राहक प्रतिनिधीचे निवेदन वस्तूस्थितीस अनुसरून नाही असे नमुद करावेसे वाटते.

सबब, या प्रकरणात मंचाने दिलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची गरज वाटत नाही. सदरचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.